राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जळगांव जिल्हातील ग्रामपंचायतींना सन २०१५-१६ मध्ये अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (बी.डी.एस.) वितरीत न झालेल्या अनुदानाच्या वितरणास मंजूरी देण्याबाबत सन २०१७-१८

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : ग्राक्षेवि - २०१८ / प्र.क्र.७/का.९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ मार्च , २०१८.

वाचा -

१) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१५/प्र.क्र.७७/ का.९, दि.२२ सप्टेंबर, २०१५.
२) शासन पूरकपत्र,अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.६/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७ /प्र.क्र.५६/ का.९, दि.२० एप्रिल, २०१७.
४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७ /प्र.क्र.१०१/ का.९, दि.११ डिसेंबर, २०१७.
५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१६ /प्र.क्र.५१/ का.९, दि.३१ मार्च,२०१६.
६) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१६ /प्र.क्र.५४/ का.९, दि.३१ मार्च,२०१६.
७) शासन परिपत्रक , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि. ६ फेब्रुवारी,२०१८

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/ पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमुहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी सन २०१५-१६ या वर्षासाठी ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत अनुदान वितरित करण्यास मंजूरी देण्यात आली होती. उपरोक्त संदर्भ क्रमांक५ येथील शासन निर्णयातील "परिशिष्ट-अ" मध्ये अ. क्र. १ ते १० मधील जळगांव जिल्ह्यांतील एकूण १० अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायतींना रु. १ कोटी इतके अनुदान तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक ६ येथील शासन निर्णयातील "परिशिष्ट-अ" मध्ये अ.क्र. १आणि २ मधील जळगांव जिल्ह्यांतील एकूण २ अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायतींना रुपये ७० लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते. तथापि अर्थसंकल्पीयवितरण प्रणालीवरील (बी.डी.एस.) तांत्रिक अडचणीमुळे जिल्हाधिकारी जळगाव यांना मंजूर निधी बी. डी. एस. प्रणालीवरुन विहीत वेळेत आहरित करता आला नाही. सदरचा निधी विहीत वेळेत आहरित न झाल्यामुळे व्यपगत झाला आहे. सबब संदर्भाधिन ५ व ६ येथील नमूद शासन निर्णयाअन्वये जळगाव जिल्हाकरिता मंजूर करण्यात आलेल्या विकासकांमाना पुन्हा निधी उपलब्ध करून देण्याची बाब विचाराधीन आहे. जळगाव जिल्ह्यातील अल्पसंख्यांक बहूल ग्रामपंचायती मध्ये मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन

देण्यासाठी उपरोक्त योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीमधून अनुदान मंजूर व वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायती मध्ये मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ करिता रु. ३५,५०,००,०००/- (अक्षरी रू. पस्तीस कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ७ येथील वित्त विभाग शासन परिपत्रक दि. ६ फेब्रुवारी,२०१८ अन्वये सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या (पुरवणी मागण्यांसह) ८०% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज वितरण प्रणालीवर (बीम्स) वितरीत करण्यास सहमती देण्यात आली आहे. त्यानुसार रु. २८,४०,००,०००/-(अक्षरी एकूण रुपये अठ्ठावीस कोटी चाळीस लक्ष फक्त) इतका निधी उपलब्ध झाला असून त्यापैकी संदर्भ क्र. ३ आणि ४ अन्वये एकूण रु.१८,१८,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये अठरा कोटी अठरा लक्ष फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित रु.१०,२२,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये दहा कोटी बावीस लक्ष फक्त) इतका निधी मार्च, २०१८ अखेर पर्यंत वितरणास उपलब्ध आहे. त्यापैकी या शासन निर्णया सोबतच्या **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविलेल्या जळगांव जिल्हातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायती मध्ये मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण **रु.१,७०,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये एक कोटी सत्तर लक्ष फक्त)** इतके अनुदान अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर व वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे विहीत अटींच्या अधीनतेने मान्यता देण्यात येत असून हे अनुदान जिल्हाधिकारी जळगांव यांचेमार्फत संबधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.

३. अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी जिल्हाधिकारी जळगांव, नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. " **परिशिष्ट -अ "** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा जिल्हाधिकारी जळगांव यांनी करावी, जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास त्या बदल्यात इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी जळगांव यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासनास जमा करण्यात यावा. तसेच जिल्हाधिकारी जळगांव यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी जळगांव यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुपूर्द करण्यात यावा.

४. ज्या विवक्षीत प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. संबंधित जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांच्याकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर ग्रामपंचायतींनी प्रस्तावात नमूद केलेली

कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या "**परिशिष्ट -ब**" मध्ये विहित केलेल्या नमुन्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील संबंधित अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींनी हाती घेतलेल्या विकास कामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी जळगांव यांनी शासनास सादर करावा.

५. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र. झेड ई-१, २२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण,१९८-ग्रामपंचायतींना सहाय्य, राज्य योजनांतर्गत योजना, ०१ अल्पसंख्याकांना सहाय्य, (०१) (०१) अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना सहायक अनुदान (२२३५ बी ०८५)" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८या वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

६. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. शासन परिपत्रक, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/ प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ क्र. अर्थसं- २०१७/ प्र.क्र.९४/ अर्थ-३, दि.३० जून, २०१७ आणि क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. ६फेब्रुवारी,२०१८ च्या प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे."

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१२२९२९४७१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.06 12:31:08 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मंबई,

३) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र शासन,

५) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

६) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,

७) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

१०) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,

११) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१२) अर्थसंकल्प शाखा (का.७), अविवि, मंत्रालय, मुंबई,

१३) निवडनस्ती (कार्यासन-९)

शासन निर्णय , अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१८/प्र.क्र.७ /का.९,
दि. ६ मार्च, २०१८
"परिशिष्ट -अ"

अ. क्र.	जिल्हा	तालुका	ग्रामपंचायतीचे नांव	कामाचे नांव	मंजूर निधी (रु. लक्ष)
१	जळगांव	चाळीसगांव	खडकी बु. (सबस्टेशन)	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
			तरवाडे बु.	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
			देवळी	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
			पातोंडा	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
			पिलखोड	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
			बहाळ	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
			वाघळी	वागळी येथील अशोक गिरीधर भोळे यांच्या घरापासून जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण.	१०.००
			सायगांव	रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१०.००
		जळगांव	ममुराबाद	ममुराबाद येथील मस्जिद उर्दू शाळा ते सुभाष देवराम चौधरी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण.	१०.००
		भुसावळ	तळवेल	ओझरखेडा रस्ता ते दलित वस्ती रस्ता	५.००
				गुरांचा दवाखाना ते दलित वस्ती रस्ता	५.००
		मुक्ताईनगर	मुक्ताईनगर	मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर येथील वार्ड क्र.२ मध्ये सेन्ट्रल बँकेपासून ते कविता वोदड ग्रामसेवक यांचे घराजवळ व पंचशिल टेलरच्या दुकानापासून ते संजु काळेच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.	१०.००
				मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर येथील वार्ड नं.४ मध्ये महेबुब काझी ते मुसा मोनी पटेल यांचे घरापर्यंत२००मी.रस्त्याचे कॉंक्रीटीकरण / डांबरीकरण करणे.	१०.००
				मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर येथील वार्ड नं.५ मध्ये अहमद छाटू ते हुसेन खाटीक यांचे घरापर्यंत १४४ मी. रस्त्याचे कॉंक्रीटीकरण / डांबरीकरण करणे.	१०.००

				मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर येथील वार्ड नं.५ मध्ये ईसा खाटीक ते संजु तायडे यांचे घरापर्यंत ८३ मी. रस्त्याचे काँक्रीटीकरण / डांबरीकरण करणे.	१०.००
				मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर येथील वार्ड नं.५ मध्ये ताहेर बाबु ते गामा नसीर पटेल यांचे घरापर्यंत १७० मी. रस्त्याचे काँक्रीटीकरण / डांबरीकरण करणे.	१०.००
				मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर येथील वार्ड नं.५ मध्ये शबनमबी शे.अनिस ते ईस्माईल बाटली यांचे घरापर्यंत१७१मी.रस्त्याचे काँक्रीटीकरण/ डांबरीकरण करणे.	१०.००
		बोदवड	बोदवड	ग्रा.प.बोदवड शहरातील स्वामी विवेकानंद नगरातील रस्त्याचे व गटारीसाठी.	१०.००
				(अक्षरी एकूण रुपये एक कोटी सत्तर लक्ष फक्त)	**१७०.००**

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.06 12:31:29 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय , अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१८/प्र.क्र. ७/का.९, दि. ६ मार्च, २०१८.

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. **ग्राक्षेवि- २०१८/ प्र.क्र.७/ का.९, दि. ६ मार्च, २०१८.** अन्वये वितरित केलेला रु. . (अक्षरी रु.) एवढा निधी पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष / अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधी मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज/अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)

२. मोजणी पुस्तके (Measurement Books)

३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)

४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक, संबंधित ग्रामपंचायत यांची स्वाक्षरी	मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांची प्रतिस्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****